
# प्र. ३ रे उत्पन्नाचे मार्ग (भाग-१)

T3





उत्पन्न
उत्पन्न संकल्पना
वैयक्तिक उत्पन्न
कारखान्यातील मजूर-मजुरी
कार्यालयीन कर्मचारी-वेतन
व्यावसायिक-नफा
उत्पन्नाचे विविध मार्ग
शेती व शेती संबंधित आर्थिक बाबी
बलुतेदारी पद्धती
बलुतेदारी पद्धती म्हणजे काय?
बलुतेदारी पद्धतीची वैशिष्ट्ये
बलुतेदारी पद्धतीचे फायदे
बलुतेदारी पद्धतीचे तोटे
अलुतेदारी पद्धती
महाराष्ट्रातील अलुतेदारी पद्धतीची वैशिष्ट्ये
शेतीपूरक उद्योग
व्यापार
उत्पन्नाचे आधुनिक मार्ग
व्यावसायिकांचे उत्पन्न

# अमर्याद मानवी गरजा

T3_L1

- विद्यार्थी मित्रांनो,आपण मागील पाठात पाहिले आहे की मानवाच्या गरजा ह्या अमर्याद आहेत आणि या गरजा सतत वाढत जात आहेत.
- लोकांना अनेक वस्तू खरेदी करायच्या असतात.उदा.पोषाख,पुस्तके,वाहने,अन्नधान्य इत्यादी.
- या मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी पैशांची आवश्यकता असते.
- त्यासाठी मानवाला पैसे कमवावे लागतात.

# उत्पन्न

T3_L2

- उत्पन्न हे पैशाच्या किंवा वस्तूच्या स्वरूपात दिले जाते.
- ग्रामीण भागात धान्य किंवा वस्तूंच्या स्वरुपात
- शहरात मिळणारे लाभ हे मोफत वैद्यकीय सेवा,सवलतीत खाद्यपदार्थ,घरभाडे,प्रवासभत्ते इत्यादींचे पैशातील उत्पन्नात समाविष्ट होतात.
- तर मग या उत्पन्नाचे मार्ग कोणते आहेत?

# वैयक्तिक उत्पन्न


T3_L2_A1

“ठराविक कालावधीत व्यक्तीला मिळालेल्या उत्पन्नाची एकूण बेरीज म्हणजे वैयक्तिक उत्पन्न होय.”



# ग्रामीण आणि शहरी व्यक्तींच्या उत्पन्नातील तफावत

T3_L2_A2



# वस्तू उत्पादनासाठी आवश्यक घटक

T3_L

खंड

भूमी

श्रम

मजुरी
किंवा वेतन

व्याज

भांडवल

संयोजक

नफा

# अवर्षण

T3_L3_A1



# महापूर

T3_L3_A2



# उत्पन्नाचे विविध मार्ग

T3_L4

**“व्यक्तीला ज्या विविध मार्गांनी उत्पन्न मिळते त्यांना उत्पन्नाचे विविध मार्ग असे म्हणतात.”**

- शेती-ग्रामीण भागात बहुतांश लोक शेती आणि त्या संबंधित आर्थिक बाबींवर अवलंबून
- शेती हंगामी व्यवसाय आहे.
- बहुतांश शेतकरी गरीब असतात.
- ते जमिनीची मशागत करण्यासाठी नांगर,बैलजोडी यांचा वापर करतात.
- श्रीमंत शेतकरी ट्रॅक्टरचा वापर करतात.

# शेती उत्पन्नाविषयी काही गोष्टी

T3_L4_A1

- शेती-ग्रामीण भागात बहुतांश लोक शेती आणि त्या संबंधित आर्थिक बाबींवर अवलंबून
- शेती हंगामी व्यवसाय आहे.
- बहुतांश शेतकरी गरीब असतात.
- ते जमिनीची मशागत करण्यासाठी नांगर,बैलजोडी यांचा वापर करतात.
- श्रीमंत शेतकरी ट्रॅक्टरचा वापर करतात.
- भूमिहीन मजूर,छोटे शेतकरी आणि जमीनदार यांचे उत्पनात मोठी तफावत.
- शेतीचे उत्पादन हे तांदूळ,ज्वारी,गहू,बाजरी,कडधान्ये या खाद्यापिकांबरोबर ऊस,कापूस,सोयाबीन या नगदी पिकांपासूनही मिळते.
- शेतीवर परिणाम करणारे अनेक घटक आहेत.उदा.अनिश्चित पाऊस,जुन्या उत्पादन पद्धतींचा वापर,जमिनीचे लहान आकार यामुळे शेतीचे उत्पादन कमी होते.
- योग्य जलसिंचन व्यवस्थेचा अभाव,अपुऱ्या कर्जसुविधा,नैसर्गिक आपत्ती यांचाही परिणाम शेती उत्पादनावर होत असतो.

# खाद्य पिके

T3_L4_A2



गहू



ज्वारी

# नगदी पिके

T3_L4_A3



ऊस



कापूस

# शेतीवर परिणाम करणारे घटक

T3_L4_A4

- अनिश्चित पाऊस
- नैसर्गिक आपत्ती अवर्षण,महापूर इत्यादी.
- योग्य जलसिंचन व्यवस्थेचा अभाव
- जुन्या उत्पादन पद्धतींचा वापर
- जमिनीचा लहान आकार
- अपुऱ्या कर्ज सुविधा

# भारत सरकारने शेती उत्पादकता वाढविण्यासाठी योजलेले उपाय

T3_L4_A5

- भूसुधारणा कायदे
- हरित क्रांती
- शिक्षण प्रसार
- जलसिंचन सुविधा
- कर्जाची सोय
- शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम

# भारतात शेती विकास महत्वाचा आहे.

T3_L4_A6

| | |
|---|---|
| शेतीची उत्पादकता | • शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी |
| रोजगार संधी | • रोजगार संधी निर्माण होण्यासाठी |
| परकीय चलन | • निर्यातीद्वारे परकीय चलन प्राप्तीसाठी |
| कच्चा माल | • उद्योगांना कच्चा माल पुरविण्यासाठी |

http://en.wikipedia.org/wiki/Green_Revolutionhttp://en.wikipedia.org/wiki/Green_Revolution

# शेतीविषयी काही विशेष

T3_L4_A7

- शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा पाठीचा कणा आहे.फक्त भारतीय अर्थव्यवस्थेच्याच नाही तर संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेचा पाठीचा कणा आहे.
- शेतीतील उत्पादन सजीवांसाठी विशेषतः मानवासाठी अत्यंत आवश्यक आहे.
- द्वितीयक व्यवसायांना कच्चा माल पुरविण्यासाठी आवश्यक उत्पादन शेतीतून होते.
- जगातील आजपर्यंत झालेली युद्धे ही संपन्न भूमीसाठी झालेली आहेत.(सुपीक जमीन,भरपूर धान्य उत्पादन,मुबलक पाणी)
- शेतीला पर्यायी व्यवस्था अजून अस्तित्वात आली नाही.
- भारतीय शेती आजही बऱ्याच प्रमाणात (अनिश्चित) पावसावर अवलंबून आहे.

# बलुतेदारी पद्धती म्हणजे काय?

T3_L

- विशिष्ट गटांतील परस्परसंबंधांवर आधारित ठरवून दिलेले विशिष्ट व्यवसाय म्हणजे बलुतेदारी होय.
- बलुतेदारी पद्धतीमध्ये बारा बलुतेदार होते.
- बलुतेदार शेतकऱ्यांना आपल्या सेवा पुरवीत असत.
- बलुतेदारांना याबदल्यात मोबदला मिळत असे.

"बलुतेदार शेतकऱ्यांना सेवा पुरवित त्या बदल्यात त्यांना जो मोबदला मिळत असे त्याला 'बलुता' किंवा 'मेहेनताना' असे म्हणत असत."

T3_L4_A9

# बलुतेदारी पद्धतीमधील बारा बलुतेदार

- सुतार
- लोहार
- कुंभार
- सोनार
- चांभार
- न्हावी
- परीट धोबी
- कोळी
- महार
- मांग
- चौगुला
- जोशी

# न्हावी लोहार

T3_L4_AS





https://www.google.co.in/search?q=%E0%A4%A8%E0%A5%8D%E0%A4%B9%E0%A4%BE%E0%A4%B5%E0%A5%80&source=lnms&tbm=isch&sa=X&ei=yz8pU9zODoKLrQe74oDoCw&ved=0C
024&bih=630#facrc=_&imgrc=rZnIBv0c6LNxMM%253A%3BfQAJV9OxFZyzeM%3Bhttp%253A%252F%252Fupload.wikimedia.org%252Fwikipedia%252Fcommons%252Fthumb%252F3%252F3e%
2F250px

# बलुतेदारी पद्धतीची वैशिष्ट्ये

T3_L4_

१
- समाज विविध गटांमध्ये विभागलेला होता.

२
- श्रमाची विभागणी व्यवसायांवर आधारित होती.

३
- व्यक्तीचा व्यवसाय त्याच्या जन्मानुसार निश्चित होत असे.

४
- लोकांचे जीवन पारंपारिक व धार्मिक होते.

५
- बलुतेदारी ही एक स्वयंचलित व्यवस्था होती.

# बलुतेदारी पद्धतीचे फायदे

T3_L4_A9_F3

- ग्रामीण समाज आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण होता.
- बेरोजगारीची समस्या नव्हती कारण पुढची पिढी त्याच व्यवसायाचे अनुकरण करीत असे.
- मानवी गरजा मर्यादित होत्या त्यामुळे आर्थिक स्थैर्य होते.
- सामाजिक ऐक्याची भावना होती.

# बलुतेदारी पद्धतीचे तोटे

T3_L4_A9_F4

**बलुतेदारीचे तोटे**

- विकासाला मर्यादित वाव होता.
- स्पर्धेच्या अभावामुळे आर्थिक प्रगती मंद होती.
- अल्प उत्पन्न गटाचे शोषण होत असे.
- व्यावसायिक बदल करण्यास प्रतिबंध होता.


# महाराष्ट्रातील अलुतेदारी पद्धतीची वैशिष्ट्ये

T3_L4_A10

- महाराष्ट्रात १८ अलुतदार असत.
- यांच्या सेवांचा मोबदला वस्तूंच्या व धान्याच्या स्वरुपात दिला जात असे.
- त्या मोबदल्यास 'अलुता' असे म्हणत.
- ते उत्पन्न वार्षिक व रूढीनुसार ठरवलेले असे.
- ते मुख्यतः हंगामाच्या वेळी दिले जाई(धान्य काढणीचा हंगाम).
- वस्तू आणि सेवांच्या मोबदल्यात इतर वस्तू देण्याची ही पद्धत पुढे वस्तू विनिमयाची पद्धत म्हणून ओळखली जाऊ लागली.
- उत्तर भारतात या पद्धतीला 'जजमानी'पद्धती म्हणून ओळखली जाते.

# सोनार चांभार

T3_L4_A1






https://www.google.co.in/search?q=%E0%A4%AC%E0%A4%BE%E0%A4%B0%E0%A4%BE+%E0%A4%AC%E0%A4%B2%E0%A5%81%E0%A4%A4%E0%A5%87%E0%A4%A6%E0%A4%BE%E0
A4%B0&source=lnms&tbm=isch&sa=X&ei=Qz0pU9SJLcWMrQe9soHQAQ&ved=0CAcQ_AUoAQ&biw=1024&bih=630#facrc=_&imgdii=vDgDjTGpAeqO9M%3A%3Ba0E5_gNxzZWdWM%3BvDgDjTGp
eqO9M%3A&imgrc=vDgDjTGpAeqO9M%253A%3BA0Vvv9mFBbWxyM%3Bhttp%253A%252F%252Fhotelsanskruti.com%252FImages%252Fbara_ballu.jpg%3Bhttp%253A%252F%252Fhotelsanskrut

# सुतार कुंभार

T3_L4_A10_F





https://www.google.co.in/search?q=%E0%A4%B8%E0%A5%81%E0%A4%A4%E0%A4%BE%E0%A4%B0&source=lnms&tbm=isch&sa=X&ei=s0ApU9PbNsmMrQeZoIDQAw&ved=0CAcQ_AUoAQ&biw=1024&bih=667#q=%E0%A4%95%E0%A5%81%E0%A4%82%E0%A4%AD%E0%A4%BE%E0%A4%B0&tbm=isch&facrc=_&imgdii=_&imgrc=rc7y4DEpuLXXsM%253A%3Bf6WhWBeYhdVNsM%3Bhttp%253A%252F%252Fwww.loksatta.com%252Fwp-content%252Fuploads%252F2013%252F10%252Fpotter.jpg%3Bhttp%253A%252F%252Fwww.loksatta.com%252Fphoto-

# पद्धती

T3_L4_A10_F3

## महाराष्ट्रातील अलुतेदारी पद्धती

- तेली
- माळी
- तांबोळी
- साळी
- धनगर
- शिंपी
- गोंधळी
- डवरी
- भाट
- ठाकर
- गोसावी
- जंगम
- वाजंत्री
- घाडी
- कलावंत
- तराळ
- भोई
- मुलाणी

# उपक्रम

T3_L4_A11

- विद्यार्थी मित्रांनो,आपण आतापर्यंत उत्पन्नाच्या मार्गांविषयी पाहिले त्यात मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी करावे लागणारे काम म्हणजे उत्पन्नाचे मार्ग आणि पूर्वीची महाराष्ट्रातील बलुतेदारी पद्धती याविषयी माहिती घेतली आहे.
- आता तुम्ही एक मस्त उपक्रम तुमच्या मित्र-मैत्रिणींच्या गटात राबवू शकता किंवा तुम्ही स्वतःही एकट्याने करू शकता.तुम्ही तुमच्या भागातील बलुतेदार व्यावसायिकांची माहिती जमा करून चित्र आणि या माहितीचा संग्रह तुमच्या शाळेत मुख्याध्यापकांच्या परवानगीने आणि शिक्षकांच्या मदतीने प्रदर्शन भरवा. यामध्ये ही माहिती जमा करताना तुम्हाला आलेले अनुभवही तुम्ही मांडा.असा हा आगळावेगळा उपक्रम तुम्हाला करताना खूप छान आनंद मिळेल आणि शिवाय तुमच्या ज्ञानात भरही पडेल.मग तयार आहात ना तुम्ही.........हो ना...........मग लागा तर कामाला................
- तुम्हाला आलेलं अनुभव आणि तुमच्या शंका तुम्ही  आम्हाला या mail वर पाठवा.

# मूल्यमापन

T3_L4_A12

- गाळलेल्या जागा भरा.

१)ठराविक कालावधीत व्यक्तीला मिळालेल्या उत्पानांची .......म्हणजे वैयक्तिक उत्पन्न होय.(एकूण मिळकत,एकूण गुणाकार,एकूण बेरीज)

२)उत्पन्न हे पैशांच्या किंवा..........स्वरुपात दिले जाते.(पदार्थांच्या,कामाच्या,वस्तूंच्या)

३)बलुतेदारांना मिळणाऱ्या मोबदल्यास बलुते किंवा..........असेही म्हणतात.(मेहेनताना,मेहेरबानी,मेहेरनजर)

४)वस्तू आणि सेवांच्या बदल्यात इतर वस्तू देण्याही पद्धत पुढे..........पद्धत म्हणून ओळखली जाऊ लागली.(वस्तू देवाणघेवाण,वस्तू दळणवळण,वस्तू विनिमय)

५)उत्तर भारतात बलुतेदारी पद्धतीला..........या नावाने ओळखले जाते.(जजमानी पद्धत,जजवणी पद्धत,जमीनदारी पद्धत)